

# झोपडीधारकांना मिळणार हक्काची घरे

**पुणे** : दांडेकर पूल परिसरात ७.४१ एकरमध्ये दोन झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील परिवर्तन या इमारतीतील १९२ सदनिका आणि ७ दुकानांचे १ जून रोजी झोपडपट्टीधारकांना हस्तांतरित करण्यात येणार आहेत. नगर विकास प्रधान सचिव नितीन करीर यांच्या हस्ते सदनिका वाटप होणार आहे. याबाबतची माहिती नाईकनवरे डेव्हलपर्सचे संचालक हेमंत नाईकनवरे यांनी दिली. यावेळी संस्थेचे संचालक रणजित नाईकनवरे उपस्थित होते. याप्रसंगी हेमंत नाईकनवरे म्हणाले, सध्या या सोसायटीतील सभासदांची सोसायटी तयार केली आहे. दांडेकर पुलाजवळ परिवर्तन आणि आणखी एक प्रकल्प उभारला जात असून, या दोन प्रकल्पांमध्ये एकूण ६ इमारती बांधल्या जात आहेत. परिवर्तन प्रकल्पातील एक इमारत पूर्ण झाली आहे. सध्या या झोपडपट्टी पुनर्वसनाचे मॉडेल हे कॉम्पेन्सेटरी एफएसआय प्रकारचे आहे. परंतु, या क्षेत्रातील सद्य व्यावसायिक परिस्थिती लक्षात घेता हे मॉडेल स्वयंपूर्ण नाही. सरकारकडून या क्षेत्रास मदत व्हावी. तसे न झाल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांचे काम अवघड होईल आणि शहरांमधील बकालपणा वाढत जाईल, असे त्यांनी सांगितले.

**दांडेकर पूल : १९२ सदनिकांचे आज हस्तांतरण**